# इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसानाबाबत अभ्यास

## जिल्हास्तरीय लघु संशोधन
## नाशिक विभाग





संशोधक

**डॉ. मंजुषा क्षीरसागर** (प्राचार्य)

व

**डॉ. शिवाजी ठाकूर** (अधिव्याख्याता)

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे



– संशोधन केंद्र –

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

सन –२०२२–२३

# इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसानाबाबत अभ्यास

## जिल्हास्तरीय लघु संशोधन
## नाशिक विभाग


**संशोधक**
**डॉ. मंजुषा क्षीरसागर**
(प्राचार्य)
व
**डॉ. शिवाजी ठाकूर**
(अधिव्याख्याता)
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

**संशोधन सहाय्यक**
सौ. अर्चना नरेंद्र वाडीले
श्रीमती वैशाली प्रकाश पाटील
विषय साधनव्यक्ती
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे



**संशोधन केंद्र**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे
सन २०२२-२३

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **प्रकरण पहिले -प्रस्तावना** | ५ ते ७ |
| | १.१ प्रास्ताविक | |
| | १.२ संशोधनाची गरज | |
| | १.३ संशोधनाचे महत्त्व | |
| | १.४ संशोधनाचे समस्या विधान | |
| | १.५ संशोधनाचे उद्दिष्टे | |
| | १.६ संशोधनाची व्याप्ती | |
| | १.७ संशोधनाची मर्यादा | |
| २. | **प्रकरण दुसरे -संबंधित साहित्याचा आढावा** | ८ |
| | २.१ प्रास्ताविक | |
| | २.२ संबंधित साहित्याची अभ्यासाची गरज | |
| ३. | **प्रकरण तिसरे -संशोधन पद्धती** | ९ ते १० |
| | ३.१ प्रास्ताविक | |
| | ३.२ संशोधनाची साधने | |
| | ३.३ संशोधनाची तंत्रे | |
| | ३.४ जनसंख्या | |
| | ३.५ नमुना निवड | |
| ४. | **प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन** | ११ते १४ |
| | ४.१ प्रास्ताविक | |
| | ४.२ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन - भाषिक कौशल्ये | |
| | ४.३ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन - गणितीय कौशल्ये | |
| ५ | **प्रकरण पाचवे -संशोधनाचे निष्कर्ष व शिफारसी** | १५ ते १६ |
| | ५.१ प्रास्ताविक | |
| | ५.२ प्रमुख निष्कर्ष | |
| | ५.३ शिफारसी | |
| ✻ | **संदर्भग्रंथ सूची** | |
| ✻ | **परिशिष्ट १ व परिशिष्ट २** | |


.

# प्रकरण १ ले

# प्रस्तावना

## १.१ प्रास्ताविक

दि. २३ मार्च २०२० पासून कोविड-१९च्या प्रभावाने जगातील सर्व मुलांचे शिक्षणाचे विश्व क्षणार्धात थांबवून टाकले होते. परंतु आलेल्या परिस्थितीवर मात करत मुलांचे शिक्षण सुरू राहावे यासाठी शिक्षकांनी ऑनलाईन व ऑफलाईन प्रणालीचा उपयोग केला. शिक्षक वाडी, वस्ती, तांडा, मंदिर, प्रसंगी मुलांच्या घरी जाऊन अध्यापन करू लागले. ऑनलाईन प्रणालीने शिक्षकांनी स्वतः आपल्या घराला एका वर्गाचे रूप देऊन घरुनच मुलांना शिकविण्याचा प्रयत्न केला. यात शिक्षकांनी Zoom App, Google meet App, Virtual Classroom, Google Class Room यासारख्या विविध ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविण्याचे प्रयत्न केले. यातून मुल शिकत आहे असे वाटत असतांना अचानक जागतिक स्तरावर अध्ययन नुकसानचे काही निष्कर्ष समोर आले. निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत इ. १ली ते ३ री साठी काही अपेक्षित लक्ष ठरवून देण्यात आलेले आहे. यात मौखिक भाषा, वाचन, लेखन, संख्यात्मक कौशल्याचा समावेश करण्यात आला आहे. त्याद्वारे जिल्हा स्तरावर काहीतरी करता येईल, असे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला वाटले. यानुसार धुळे जिल्ह्यात देखील विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान झाले असेल आणि ते अध्ययन नुकसान नेमकं शोधण्यासाठी प्रस्तुत चाचणी घेण्यात आलेली होती. चाचणी घेण्यासाठी निपुण भारत या नॅशनल एज्युकेशन पॉलिसी -२०२० ने सांगितलेल्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यात अपेक्षित असलेली इ. १ ली ची उद्दिष्टे इ. १ ली सह ४ थीच्या मुलांना येतात की नाही हे संबंधित चाचणीतून पाहण्यात आले. इ. १ ली ला अपेक्षित असणारी भाषा कौशल्ये व संख्यात्मक कौशल्ये यातील सद्यस्थिती पाहण्यात आली.

### इयत्ता पहिलीला अपेक्षित असणारी

१) भाषा विषयक कौशल्ये यात वाचन कौशल्ये, मौखिक कौशल्ये व लेखन कौशल्ये येतात.

### अ) मौखिक कौशल्ये

१) आपल्या गरजा व परिसराविषयी मित्र व शिक्षकांशी बोलतो.

२) वर्गात उपलब्ध सामग्रीबद्दल बोलतो.

३) कविता/गाणे कृतीयुक्त म्हणतो.

### ब) वाचन

R1) अभिनयाने मोठ्याने गोष्ट सांगणे, त्यावरील प्रश्नांना उत्तरे देतो.

R2) ऐकून शब्द लिहितो

R3) अपठित ४-५ शब्दांचे वाक्य वाचन करतो.

### क) लेखन

W1) परिचित संदर्भ (गोष्ट/कविता/पर्यावरण) मध्ये वापरले जाणारे शब्दांची ओळख आहे.

W2) चित्र काढणे, शुभसंदेश व चित्र यावर नाव लिहिणे

## २) संख्यात्मक कौशल्ये-गणितीय कौशल्ये

M1) २० पर्यंतच्या वस्तू मोजता येतात.

M2) ९९ पर्यंतच्या संख्या वाचतो व लिहितो.

M3)दैनंदिन जीवनात ९ पर्यंतच्या संख्यांची बेरीज व वजाबाकी करतो.

M4)त्रिमितीय वस्तूंचे वर्णन करतो (पृष्ठभाग, कोपरा, कडा).

M5)हात, वित, पाऊल, बोटे या अप्रमाणित मापकाच्या सहाय्याने धारकतेचा अंदाज बांधतो, मोजतो.

M6)चमचा, कप, मग या अप्रमाणित मापकाच्या सहाय्याने धारकतेचा अंदाज करतो.

M7)आकार व संख्यांचा उपयोग करून छोटी कविता आणि गोष्टी तयार करतो व पाठ करतो.

वरील सर्व अपेक्षित लक्ष ठेवून प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली व चाचणीद्वारे अध्ययन नुकसान सद्यस्थिती पाहण्यात आली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार इ. ३ री अखेर सर्व विद्यार्थ्यांनी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करणे यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. शालेय शिक्षणाचा विशिष्ट आकृतीबंध ठरविण्यात आला आहे. हा आकृतीबंध ५+३+३+४ असा आहे. याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

१) पायाभूत टप्पा : अंगणवाडी/पूर्व प्राथमिक चे ३ वर्षे + प्राथमिक इ. १ ली , २ री (वयोगट ३ ते ८ वर्षे)

२) पूर्व तयारी टप्पा : इ. ३ ते ५ वी (वयोगट ८ ते ११ वर्ष)

३) मधला टप्पा - इ. ६ ते ८ वी (वयोगट ११ ते १४ वर्षे)

४) माध्यमिक टप्पा - इ. ९ वी ते १२ वी (वयोगट १४ ते १८ वर्षे)

**याचे दोन टप्पे केलेले आहेत.**

१) पहिला टप्पा - इ. ९ वी आणि १० वी

२) दुसरा टप्पा - इ. ११ वी आणि १२ वी

वरील सर्व टप्प्यांसाठी विशिष्ट अभ्यासक्रम ठरविण्यात आला आहे.

भारत सरकारच्या, निपुण भारत अभियान अंतर्गत, महाराष्ट्र शासनाने २७ ऑक्टोबर २०२१ रोजी मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करणेसाठी शासन निर्णय पारित केला. त्यानुसार २०२६-२७ पर्यंत इ. ३ री पर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गाच्या मूलभूत क्षमता प्राप्त करणे अनिवार्य आहे. कोव्हिड -१९ च्या काळात जरी ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेण्यात आलेले असले तरी त्याद्वारे १००% मुल शिकलेले नाहीत. आदिवासी भागातील मुले तर ऑनलाईन किंवा ऑफलाईन शिक्षणाच्या प्रवाहात नव्हतीच. त्यानंतर जेव्हा मुल प्रत्यक्ष वर्गात आले तेव्हा मुलांच्या बसण्यापासून तर मुलांच्या शिकण्यापर्यंतच्या अडचणी शिक्षकांच्या लक्षात येऊ लागल्या. त्यासाठी किमान इ. १ लीतील मूलभूत-क्षमता मुले विसरली आहेत की नाही हे तपासण्याचे शिक्षणाची गुणवत्तेची शिखर संस्था या नात्याने ठरविण्यात आले. तद्नंतर हा विषय सुकाणू समितीत मांडण्यात आला व शाळा भेटी करण्यात आल्या.

## १.२ संशोधनाची गरज

कोविड -१९ काळात ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने मुलांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न धुळे जिल्ह्यात किती यशस्वी झाला हे तपासणे देखील गरजेचे होते. म्हणून खालील मुद्यांच्या आधारे संशोधन करणे प्रस्तुत संस्थेला गरजेचे वाटले.

१. कोरोना -१९ महामारीमुळे शिक्षणाचे झालेले नुकसान जाणून घेण्यासाठी व त्यावर काही उपाययोजना करता येईल कां?

२. विद्यार्थ्यांचे प्रगतीचे मूल्यमापन परिणामकारकरित्या करण्यासाठी उपाय शोधता यावेत.

३. कोणतेही मूल अभ्यासात मागे राहू नये म्हणून मूल निहाय कृतीकार्यक्रमाची गरज वाटते काय?

४. विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान जाणून त्यावर आधारित कृती कार्यक्रम राबवावा का?

प्रस्तुत प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या अनुषंगाने संशोधन गरजेचे वाटते.

## १.३ संशोधनाचे महत्त्व

१) कोविड -१९ च्या काळात विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसानाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे आहे.

२) कोरोना महामारीमुळे शिक्षणाचे झालेले नुकसान जाणून घेण्यासाठी आणि त्यावर योग्य उपाययोजना करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

३) विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन परिणामकारक करण्यासाठी या संशोधनातून नेमकी उत्तरे संशोधनातून सापडली म्हणून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

४) कोणतेही मूल अभ्यासात मागे राहू नये म्हणून शिक्षकाला मूलनिहाय कृतीकार्यक्रम या संशोधनातून प्राप्त होईल.

## १.४ संशोधनाचे समस्या विधान

इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसानाबाबत अभ्यास.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

१) धुळे जिल्ह्यातील इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची अध्ययन नुकसान सद्यस्थिती क्षेत्रीय यंत्रणेमार्फत जाणून घेणे.

२) धुळे जिल्ह्यातील इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची अध्ययन नुकसान सद्यस्थिती विद्यार्थी-निहाय तपासणे.

३) इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी कृती कार्यक्रम/कृती आराखडा तयार करणे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती

१) प्रस्तुत संशोधनात धुळे जिल्ह्यातील धुळे महानगरपालिका (शहर), धुळे, शिरपूर, शिंदखेडा व साक्री या तालुक्यांचा समावेश आहे.

२) प्रस्तुत संशोधनात जि.प., न.प., म.न.पा., खाजगी अनुदानित, खाजगी विनाअनुदानित, खाजगी अंशतः अनुदानित, एकात्मिक, आदिवासी विकास योजनेअंतर्गत येणाऱ्या सर्व आश्रम शाळांच्या विद्यार्थ्यांपुरते व्याप्त राहील.

३) प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या अध्ययन नुकसान सद्यस्थितीचा अभ्यास केला आहे.

४) सदर संशोधन एक दिवसीय शाळा भेटीवरून गुगल लिंकद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे केलेले आहे.

## १.७ संशोधनाची मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन धुळे जिल्ह्यातील चार तालुके-धुळे, शिरपूर, शिंदखेडा, साक्री व महानगरपालिका क्षेत्रापुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन, जि.प., न. प., म.न.पा., समाजकल्याण खाजगी अनुदानित, खाजगी विनाअनुदानित, अंशतः अनुदानित, एकात्मिक आदिवासी विकास योजना अंतर्गत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन विद्यार्थ्यांच्या अध्ययन सद्यस्थितीचा अभ्यास करण्यापुरतचे मर्यादित आहे.

४) सदर संशोधन ३१/१२/२०२१ या एकदिवसीय शाळा भेटी करून गुगल लिंकद्वारे भरलेल्या माहिती पुरतेच मर्यादित आहे.

# प्रकरण २ रे
# संबंधित साहित्याचा आढावा

## २.१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संशोधनाचा आराखडा, अहवाल लेखन, संशोधन साधनांची निर्मिती, माहितीचे विश्लेषण, निष्कर्ष यासाठी संबंधित साहित्याचा अभ्यास करण्यात आला.

## २.२ अध्ययन नुकसानाबाबत अभ्यासक्रम

१) युनेस्कोने केलेल्या अभ्यासानुसार भारतातील विद्यार्थ्यांचा शालेय शिक्षणाच्या ६५% ते ७४% वेळ वाया गेला आहे.

२) अझिम प्रेमजी विद्यापीठाने केलेले सर्वेक्षण - सप्टेंबर २०२० मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार केवळ ४२% मुले ऑनलाईन वर्गाला उपस्थित राहू शकली. व ९०% पेक्षा अधिक शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन परिणामकारकरित्या करणे अशक्य झालेले दिसून येते.

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० - NEP २०२० नुसार प्राथमिक स्तरावर सन २०२६-२७ पर्यंत मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्ये प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. शालेय शिक्षणाचा विशिष्ट आकृतीबंध ठरविण्यात आला आहे.

४) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान - सन २०२६-२७ पर्यंत इ. ३ री पर्यंतच्या १००% विद्यार्थ्यांना मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता ३ री पुढे गेलेल्या तथापि अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

गत संशोधनाचा आढावा घेण्यासाठी कोविड १९ नंतर प्रथमच शाळा बंद आणि अध्ययन नुकसान विषय समोर आले. धुळे जिल्ह्यात व इतरत्र शैक्षणिक संस्थांमधून फारसे संशोधन दिसून आले नाही.

# प्रकरण ३ रे

# संशोधन पद्धती

### ३.१. प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पद्धती, जनसंख्या नमुना निवड, साधन तंत्रे याबाबत थोडक्यात माहिती दिलेली आहे.

### ३.२ संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या साधनांचा उपयोग केलेला आहे.

### ३.३ संशोधनाची तंत्रे

इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान शोधून काढण्यासाठी राबविलेल्या मोहिमेच्या अहवालाचे दस्तऐवज वापरण्यात आले आहेत. दस्तऐवजावरून संकलित झालेल्या माहितीवरून अर्थनिर्वचन काढण्यासाठी टक्केवारी या सांख्यिकीय प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.

### ३.४ जनसंख्या

प्रस्तुत संशोधनात निवड केलेल्या जि.प., न.पा., म.न.पा., समाज कल्याण, खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, अंशतः अनुदानित एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत शाळेतील विद्यार्थी ही संशोधनाची जनसंख्या आहे.

| अ.क्र. | तालुका | एकूण शाळा | खाजगी अंशतः अनुदानित | खाजगी अनुदानित | खाजगी विना अनुदानित | जिल्हा परिषद | समाज कल्याण | महानगर पालिका | नगर पालिका | एकात्मिक आदिवासी विकास योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धुळे | २५६ | ६ | १०७ | ४ | २२५ | १ | - | - | - |
| २. | धुळे शहर | १५२ | १० | ११९ | ४ | - | - | १९ | - | - |
| ३. | शिंदखेडा | १७४ | ८ | ८८ | ७ | १६८ | - | - | ६ | ३ |
| ४. | शिरपूर | २७९ | ५ | ७१ | २ | २६८ | - | - | १० | ७ |
| ५. | साक्री | ४१३ | ८ | १०४ | २ | ४४२ | १ | - | - | १३ |
| | **एकूण** | **१२७४** | **३७** | **४८९** | **१९** | **११०३** | **२** | **१९** | **१६** | **२३** |

## ३.५ नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी सहेतूक नमुना निवड केलेली आहे.

### अध्ययन नुकसान सद्यस्थिती प्रपत्र भरणाऱ्या शाळांची संख्या

| अ.क्र. | तालुका | एकूण शाळा | खाजगी अंशतः अनुदानित | खाजगी अनुदानित | खाजगी विना अनुदानित | जिल्हा परिषद | समाज कल्याण | महानगर पालिका | नगर पालिका | एकात्मिक आदिवासी विकास योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धुळे | २५६ | ०२ | १५ | ०५ | २३२ | ०२ | - | - | - |
| २. | धुळे शहर | १९ | - | ०८ | ०४ | ०१ | - | ०६ | - | - |
| ३. | शिंदखेडा | १७४ | ०१ | ०२ | ०१ | १६४ | - | - | ०६ | - |
| ४. | शिरपूर | २७९ | ०१ | १३ | ०३ | २५२ | - | - | ०९ | ०१ |
| ५. | साक्री | ४१३ | ०१ | १६ | ०१ | ३९५ | - | - | - | - |
| | **एकूण** | **११४१** | **०५** | **५४** | **१४** | **१०४४** | **०२** | **०६** | **१५** | **०१** |

# प्रकरण ४ थे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

## ४.१ प्रास्ताविक

निपुण भारत अंतर्गत अध्ययन नुकसान सद्यस्थिती शोधणेसाठी काही उद्दिष्टे ठरविण्यात आली. यात इ. १ली च्या मुलाला ज्या मुलभूत क्षमता प्राप्त व्हायला हव्यात त्यात मौखिक भाषा, वाचन क्षमता, लेखन क्षमता तसेच संख्यात्मक क्षमता येतात. यातील प्रत्येक क्षमतेचे अपेक्षित लक्ष ठरविले आहे. त्यानुसार इ. १ ली च्या अपेक्षित क्षमता अनुक्रमे इ. २ री, इ.३ री, ४थीच्या मुलालाही प्राप्त आहेत की नाही? हे शोधण्यात आले. यात त्या त्या इयत्तांच्या मूलभूत क्षमतेचा विचार न करता फक्त इ. १ली च्या क्षमता इ. २ री, ३ री व ४ थीच्या मुलाला प्राप्त आहेत का? याचा विचार करण्यात आला.

## ४.२ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

**तक्ता क्र. १ – विद्यार्थी अध्ययन नुकसान सद्यस्थिती**

| | इ. १ ली | | इ.२ री | | इ. ३ री | | इ. ४ थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पटसंख्या | २५८०४ | – | २३३९२ | – | २४८८४ | – | २४६०१ | – |
| उपस्थिती | २०९०४ | ८१.०१ | १९६४९ | ८३.९९ | २१००८ | ८४.४२ | २१०९७ | ८५.७६ |
| मौखिक भाषा | १८३५० | ८७.७८ | १७५५२ | ८९.३३ | १९३३३ | ९२.०३ | १९५६० | ९२.७१ |
| | १६४४८ | ७८.६८ | १६३०१ | ८२.९६ | १८२९४ | ८७.०८ | १८६०० | ८८.१६ |
| | १४६९८ | ७०.३१ | १४३१३ | ७२.८४ | १६४२७ | ७८.१९ | १७२५७ | ८१.८० |
| वाचन | ९६४८ | ४६.१५ | १०५५० | ५३.६९ | १४१३३ | ६७.२७ | १४३८३ | ६८.१८ |
| | ६४३१ | ३०.७६ | ८७६३ | ४४.६० | १२१९७ | ५८.०६ | १४३२७ | ६७.९१ |
| | ४३५० | २०.८१ | ७१४५ | ३६.३६ | १०९७३ | ५२.२३ | १३१५३ | ६२.३५ |
| लेखन | ९४३७ | ४५.१४ | १०६४६ | ५४.१८ | १७६९२ | ८४.२२ | १४८४० | ७०.३४ |
| | ८६६४ | ४१.४५ | १०९५१ | ५५.७३ | १४०४८ | ६६.८७ | १५८२० | ७४.९९ |
| संख्यात्मक | १४२८१ | ६८.३२ | १६०७६ | ८१.८२ | १९०१९ | ९०.५३ | १९४९० | ९२.३८ |
| | ५७०९ | २७.३१ | १०७९६ | ५४.९४ | १५०४२ | ७१.६० | १६९१८ | ८०.१९ |
| | ९०३८ | ४३.२४ | १२८०७ | ६५.१८ | १६९२५ | ८०.५६ | १८३९४ | ८७.१९ |
| | ४९४७ | २३.६७ | ८८२१ | ४४.८९ | १२८९४ | ६१.३८ | १४६२१ | ६९.३० |
| | ६२४९ | २९.८९ | ९३८५ | ४७.७६ | १३९६३ | ६६.४७ | १५१९१ | ७२.०१ |
| | ५४०१ | २५.८४ | ८२०६ | ४१.७६ | १२९३८ | ६१.५९ | १४३४१ | ६७.९८ |

## ४.२ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन -

### ४.२.१ विश्लेषण

१) वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान शोधून काढण्यासाठी राबविलेल्या मोहिमेच्या दिवशी इ. १ ली ते ४ थी ची उपस्थिती अनुक्रमे ८१.०१, ८३.९९, ८४.४२ व ८५.७६ टक्के दिसून येते.

२) इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण ८०% ते ८५% च्या दरम्यान आहे.

### ४.२.१ अर्थनिर्वचन

अध्ययन नुकसान शोध मोहिमेच्या दिवशी इ. १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण समाधानकारक दिसून येते.

### ४.२.२ मौखिक भाषा

### विश्लेषण

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की,

१) मौखिक भाषा विकासातील ०१ कौशल्यात इ. १ ली ते इ. ४ थी ची संपादणूक अनुक्रमे ८७.७८, ८९.३३, ९२.०३ तर ९२.७१टक्के दिसून येते.

२) मौखिक भाषा विकासातील ०२ कौशल्यात इ. १ली - ७८.६८, इ. २ री ८२.९६, इ. ३ री ८७.०८ व इ. ४ थी ८८.१६ इतकी टक्के आढळून आली.

३) मौखिक भाषा विकासातील ०३ कौशल्यात इ. १ली ते ४ थी ची संपादणूक अनुक्रमे ७०.३१, ७२.८४, ७८.१९, ८१.८० टक्के इतकी दिसून येते.

### अर्थनिर्वचन

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान शासन निर्णयानुसार लेखन व वाचनाची कौशल्ये विकसित करण्यासाठी मौखिक भाषेचा विकास महत्त्वाचा आहे. कोविड १९ च्या काळात ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न झाले तरी प्रयत्नांची यशस्विता समाधानकारक दिसून येत नाही.

मौखिक भाषा विकासातील ०१, ०२, ०३ या कौशल्यात चारही वर्गांची संपादणूक जवळपास सरासरी ८४% दिसून येते. यावरून असे समजते की, इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना इ. १ली चे मौखिक भाषा कौशल्ये १००% अवगत असणे अपेक्षित होते. परंतु फक्त ८४% विद्यार्थ्यांना मौखिक भाषा कौशल्ये अवगत आहेत. म्हणजेच इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान झालेले दिसून येते.

### ४.२.३ वाचन क्षमता

#### विश्लेषण

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की,

१) वाचन क्षमतेतील R1 कौशल्यात इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे ४६.१५, ५३.६९, ६७.२७, ६८.१८ टक्के दिसून येते.

२) वाचन क्षमतेतील R2 कौशल्यात इ. १ ली ३०.७६%, इ. २ री ४४.६०%, इ. ३ री ५८.०६% व इ. ४ थीची ६७.९१% विद्यार्थी संपादणूक आढळून आली.

३) वाचन क्षमतेतील R3 कौशल्यात इ. १ ली ते इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे २०.८१, ३६.३६, ५२.२३, ६२.३५ टक्के इतकी दिसून येते.

#### अर्थनिर्वचन

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान शासन निर्णयानुसार वाचन क्षमतेतील उच्चार शास्त्राची जाणीव (शब्द, लय व ध्वनी )सांकेतिक भाषा/ लिपी समजून घेणे, मौखिक वाचन लेखन शब्दसंग्रह आकलनासह वाचन, वाचनातील ओघवतेपणा या कौशल्याची प्राप्ती वाचन क्षमतेत इ. १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना असणे अपेक्षित आहे.

वाचन क्षमतेत R1, R2, R3 या कौशल्यात चारही वर्गांची विद्यार्थी संपादणूक जवळपास ५५% दिसून येते. यावरून इ. २ री ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्याची संपादणूक असमाधानकारक आहे. म्हणजेच इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान मोठ्या प्रमाणावर झालेले दिसून येते.

### ४.२.४ लेखन क्षमता

#### विश्लेषण

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की,

१) लेखन क्षमतेतील W1 कौशल्यात इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे ४५.१४, ५४.१८, ८४.२२, ७०.३४ टक्के दिसून येते.

२) लेखन क्षमतेतील W2 कौशल्यात इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्याची संपादणूक अनुक्रमे ४१.४५. ५५.७३, ६६.८७, ७४.९९ टक्के दिसून येते.

#### अर्थनिर्वचन

लेखन क्षमतेत अक्षरे व शब्द लिहिणे, आकलनासह लेखन करणे या महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश होतो. इ. १लीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित असलेले लेखन कौशल्ये इ. २ री ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना देखील विचारले आहेत.

इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची लेखन क्षमतेतील संपादणूक १००% असणे गरजेचे असताना सरासरी ६१% दिसून येते. यावरून लेखन क्षमतेत इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान झालेले दिसते.

## ४.३ गणितीय कौशल्ये (संख्यात्मक)

### विश्लेषण

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की,

१) M 1 कौशल्यात इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे ६८.३२, ८१.८२, ९०.५३ व ९२.३८ टक्के दिसून येते

२) M 2 कौशल्यात इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे २७.३१, ५४.९४, ७१.६०, ८०.१९ टक्के दिसून येते.

३) M 3 गणितीय कौशल्यात इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे ४३.२४, ६५.१८, ८०.५६, ८७.१९ टक्के दिसून येते.

४) M4 या गणितीय कौशल्यात इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे २३.६७, ४४.८९, ६१.३८, ६९.३०टक्के दिसून येते.

५) M 5 या गणितीय कौशल्यात इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे २९.८९, ४७.७६, ६६.४७, ७२.०१ टक्के दिसून येते.

६) M 6 या गणितीय कौशल्यात इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांची संपादणूक अनुक्रमे २५.८४, ४१.७६, ६१.५९, व ६७.९८ टक्के दिसून येते

### अर्थनिर्वचन

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान शासन निर्णयानुसार गणन, संख्याज्ञान, संख्येवरील क्रिया करणे, आकार व अवकाश याबाबत समजून घेणे यासारख्या कौशल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. च १, च २, च ३, च ४, च ५, च ६ या संख्यात्मक गणितीय कौशल्यात इ. १ली ते ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची संपादणूक जवळपास सरासरी ५५% दिसून येते. म्हणजेच विद्यार्थी संपादणूक असमाधानकारक आहे. यावरून इ. २ री च्या विद्यार्थ्यांचे १ वर्ष, इ. ३ रीच्या विद्यार्थ्यांचे २ वर्ष व इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांचे ३ वर्षांचे अध्ययन नुकसान झालेले दिसून येते.

# प्रकरण ५ वे
# संशोधनाचे निष्कर्ष व शिफारसी

## ५.१ प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सारांश, निष्कर्ष, शिफारशी यांचा समावेश करण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यातील इ. १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान शोधन काढण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे मार्फत चाचणी घेण्यात आली होती. त्यातून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

## ५.२ प्रमुख निष्कर्ष

१. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या शासन निर्णयानुसार धुळे जिल्ह्यातील इ. १ लीच्या विद्यार्थ्यांची मौखिक भाषा विकासातील भाषण - संभाषण कौशल्ये इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना १००% अवगत नाहीत. यावरून इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान झालेले दिसते.

२. पायाभूत साक्षरतेमध्ये कोणत्याही भाषेत मौखिक पद्धतीत अभिव्यक्त होता येणे, समजपूर्वक व ओघवत्या स्वरूपात वाचन करता येणे अपेक्षित आहे. परंतु इ. १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना इ. १ ली चे अपेक्षित लक्ष देखील प्राप्त नाहीत. यावरून त्यांचे वाचन कौशल्यात अध्ययन नुकसान झालेले दिसून येते.

३. पायाभूत साक्षरतेनुसार मनातील लिहिता येते व वाचताही येते ही जाणीव रुजविण्यासाठी लेखन हे कौशल्य महत्त्वाचे आहे. परंतु इ. १ली साठीचे अपेक्षित लेखन कौशल्ये इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना अत्यल्प प्रमाणात अवगत आहेत. यावरून इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान झालेले दिसते.

४. पायाभूत संख्याज्ञानाविषयक इ. १ लीच्या क्षमता व कौशल्ये व इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा १००% अवगत नाहीत. यावरून त्यांचे पायाभूत संख्याज्ञानातील संपादणुकीत अध्ययन नुकसान झालेले आढळते.

## ५.३ शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सारांश, निष्कर्ष, शिफारशी यांचा समावेश करण्यात आला आहे. अध्ययन नुकसान सद्यस्थिती जाणून अपेक्षित गुणवत्तावाढीसाठी जिल्हा परिषद (प्राथ. व माध्य. शिक्षण विभाग) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे या अंतर्गत येणाऱ्या सर्व यंत्रणेसाठी शिफारसी देण्यात आलेल्या आहेत.

### १) शिक्षक

कोरोना काळात झालेले अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी इ. १ ली ते ४ थीच्या वर्गशिक्षकांनी मूलनिहाय कृती कार्यक्रम तयार करावा. शाळा सुरू होण्यापूर्वी किंवा शाळा संपल्यानंतर अर्धातास नियोजनबद्ध अध्यापन करावे परिणामी विद्यार्थ्यांना अध्ययन

निष्पत्ती प्राप्त होतील व सर्व अपेक्षित क्षमता प्राप्त होऊ शकतील.

**२) मुख्याध्यापक**

इ. १ ली ते ४ थी च्या वर्गशिक्षकांकडून मूलनिहाय कृती कार्यक्रमाची अंमजलबजावणी व्हावी यासाठी शिक्षकांचा विषयनिहाय सद्यस्थितीस आढावा घेतल्यास विद्यार्थ्यांना अपेक्षित लक्ष प्राप्त होऊ शकते.

**३) केंद्रप्रमुख**

केंद्रप्रमुखांनी स्वत: शाळाभेटी दरम्यान इयत्तांची अध्ययनस्तर वर्गनिहाय विद्यार्थ्यांची किंवा एका इयत्तेतील विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती करून शिक्षकांकडून करून घ्यावी. एका इयत्तेच्या मूलनिहाय नेमक्या कोणत्या कृती कराव्यात. पाठ्यपुस्तके, उपलब्ध असलेले शैक्षणिक साहित्य, कृती पुस्तिकेचा वापर करून अध्ययन नुकसान भरून काढणेसाठी शिक्षकांना मार्गदर्शन करावे.

**४) विस्तार अधिकारी**

विस्तारी अधिकारी यांनी आपल्या बीटातील असलेल्या इ. १ ली ते ४ थीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी केलेल्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य रित्या होत आहे किंवा नाही हे तपासावे.

**५) गटशिक्षणाधिकारी/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी**

यांनी आपल्या क्षेत्रातील इ. १ली ते ४ थीच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचे अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी शिक्षकांनी केलल्या कामाचा आढावा घ्यावा म्हणजे अपेक्षित क्षमता प्राप्त होऊ शकतील. गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षण परिषदेत शिक्षकांना अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी प्रेरणा द्यावी.

**६) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), धुळे अंतर्गत येणारे अधिकारी/विषयसाधनव्यक्ती/समावेशित तज्ञ**

शाळा भेटी करताना आवर्जुन अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी मार्गदर्शन करावे. मूलनिहाय क्षमता प्राप्त आहेत किंवा नाही हे तपासणे, वेळोवेळी अपेक्षित लक्षप्राप्ती करणेसाठी शिक्षकांना प्रेरणा द्यावी.

**⁕ संदर्भग्रंथ सूची**

**१.** अध्ययन नुकसान बाबतचे सर्व परिपत्रके
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

**२.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०
मानव संसाधन विकास मंत्रालय (शिक्षण मंत्रालय)
भारत सरकार

**३.** मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान शासन निर्णय २७ ऑक्टोबर २०२१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

**परिशिष्ट १**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे व शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धुळे**

(हे प्रपत्र दि.३१/१२/२०२१ च्या स्थितीस अनुसरुन भरावे व सदर गुगल फॉर्म मध्ये फोटो काढून दिनांक ०३/०१/२०२२ पर्यंत अपलोड करावे)

महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे व शिक्षण विभाग (प्राथ.) जि. प.धुळे.

विद्यार्थी अध्ययन नुकसान सद्यस्थिती प्रपत्र

१) तालुका

☐ धुळे शहर

☐ धुळे

☐ साक्री

☐ शिंदखेडा

☐ शिरपूर

२) बिटाचे नाव

______________________________

३) केंद्राचे नाव

______________________________

४) शाळेचे नाव

______________________________

५) शाळेचा UDISE कोड(११ अंकी)

______________________________

६) शाळा व्यवस्थापन प्रकार

- ☐ जिल्हा परिषद
- ☐ महानगरपालिका
- ☐ नगरपालिका
- ☐ खाजगी अनुदानित
- ☐ खाजगी अंशत: अनुदानित
- ☐ खाजगी विना अनुदानित
- ☐ एकात्मिक आदिवासी विकास योजना
- ☐ समाजकल्याण

७) शाळेचे माध्यम

- ☐ मराठी
- ☐ हिन्दी
- ☐ इंग्रजी
- ☐ उर्दू
- ☐ इतर

८) माहिती भरणाऱ्या मुख्यध्यापकाचे पूर्ण नाव

______________________________

९) मोबाईल क्रमांक

______________________________

.

१०) विद्यार्थी अध्ययन नुकसान सद्यस्थिती प्रपत्र व्यवस्थित भरून त्याचा फोटो काढून अपलोड करावा

प्रपत्रावर शाळेचा युडायस क्रमांक नमुद करावा

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे व शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धुळे

## विद्यार्थी अध्ययन नुकसान सद्यस्थिती प्रपत्र

| अ. क्र. | | सद्यस्थिती | इ. १ली | | | इ. २ री | | | इ. ३ री | | | इ. ४ थी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पटसंख्या | गैरहजर | किती विद्यार्थ्यांना सदर बाब येते | पटसंख्या | गैरहजर | किती विद्यार्थ्यांना सदर बाब येते | पटसंख्या | गैरहजर | किती विद्यार्थ्यांना सदर बाब येते | पटसंख्या | गैरहजर | किती विद्यार्थ्यांना सदर बाब येते |
| १ | मौखिक भाषा | १. आपल्या गरजा व परिसराविषयी मित्र व शिक्षकांशी बोलतो | | | | | | | | | | | | |
| २ | | २. वर्गात उपलब्ध सामग्रीबद्दल बोलतो | | | | | | | | | | | | |
| ३ | | ३. कविता/गाणे कृतीयुक्त म्हणतो | | | | | | | | | | | | |
| ४. | वाचन | १. अभिनयाने मोठ्याने गोष्ट सांगणे, त्यावरील प्रश्नांना उत्तरे देतो. | | | | | | | | | | | | |
| ५ | | २. ऐकून शब्द लिहितो | | | | | | | | | | | | |
| ६ | | ३. अपठित ४-५ शब्दांचे वाक्य वाचन करतो. | | | | | | | | | | | | |
| ७ | लेखन | १. परिचित संदर्भ (गोष्ट/कविता/पर्यावरण) मध्ये वापरले जाणारे शब्दांची ओळख आहे. | | | | | | | | | | | | |
| ८ | | २. चित्र काढणे, शुभ संदेश व चित्र यावर नाव लिहिणे | | | | | | | | | | | | |
| ९ | संख्यात्मक | १. २० पर्यंतच्या, वस्तु मोजता येतात | | | | | | | | | | | | |
| १० | | २. ९९ पर्यंतच्या संख्या वाचतो व लिहितो | | | | | | | | | | | | |
| ११ | | ३. दैनंदिन जीवनात ९ पर्यंतच्या संख्यांची बेरीज व वजाबाकी करतो | | | | | | | | | | | | |
| १२ | | ४. त्रिमितीय वस्तूंचे वर्णन करतो. (पृष्ठभाग, कोपरा,कडा) | | | | | | | | | | | | |
| १३ | | ५. हात, वित, पाऊल, बोटे या अप्रमाणित मापकाच्या साहाय्याने लांबीचा अंदाज बांधतो, मोजतो. | | | | | | | | | | | | |
| १४ | | ६. चमचा, कप, मग या अप्रमाणित मापकाच्या साहाय्याने धारकतेचा अंदाज करतो व बांधतो. | | | | | | | | | | | | |
| १५ | | ७. आकार व संख्यांचा उपयोग करून छोटी कविता आणि गोष्टी तयार करतो व पाठ करतो. | | | | | | | | | | | | |

सदर प्रपत्र शाळेवर ठेवावे व अधिकारी भेटीच्या वेळी अधिकाऱ्यांना दाखवावे

# परिशिष्ट २
# धुळे जिल्ह्यातील शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांचे पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान ओळख प्रशिक्षण दि.०२/०७/२०२२

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची जाणीव जागृती करण्याच्या हेतूने हे प्रशिक्षण आयोजित केलेले आहे.

२. ही लिंक भेट देणारे अधिकारी/कर्मचारी/शाळा व्यवस्थापन समिती तथा मुख्याध्यापक यांनीच भरावी

* Indicates required question

१. भेट देणाऱ्या अधिकारी/कर्मचारीचे/मुख्याध्यापक यांचे नाव

_______________

२. पदनाम

_______________

३. मोबाईल क्रमांक

_______________

४. शाळेचा UDISE

_______________

५. शाळेचे नाव

_______________

६. केंद्र

_______________

७. तालुका

- ☐ धुळे
- ☐ साक्री
- ☐ शिंदखेडा
- ☐ शिरपूर
- ☐ धुळे मनपा

८. फक्त शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थिती संख्या

---

९. शाळा व्यवस्थापन समिती सदस्याव्यतिरिक्त पालक उपस्थिती संख्या

---

१०. शाळेचे शिक्षक ( SMC सदस्य वगळता) उपस्थिती संख्या

---

११. या व्यतिरिक्त कोणी उपस्थित असल्यास संख्या

---

१२. प्रशिक्षणात उपस्थितांची एकूण संख्या

---

# नोंद

# नोंद